MHKO110017402017

**नियमित दिवाणी दावा क्र.११५/१९९६.**
(CNR No.**MHKO110017402017**)

# निशाणी क्रमांक २०६ व निशाणी क्र.२०८ खालील एकत्रित आदेश.

( धोंडूबाई पोवार वि. बाळु यादव )

वादी यांनी **निशाणी क्र.२०६** खालील अर्ज व प्रतिवादी क्र.१ यांनी **निशाणी क्र. २०८** खालील अर्ज हे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ०५ अन्वये दाव्यामध्ये जादा मुद्दे निश्चित करण्यासाठी दाखल केले आहेत.

०२. वादी यांच्या **निशाणी क्र.२०६** मधील अर्जानुसार, प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व स्वतंत्र कब्जासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल करून, दावा मिळकतींचे वादीचे पुर्वहक्कदार व प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांच्यात फार वर्षापूर्वी वाटप होवून ज्याच्या त्याच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झालेली असून त्यांचे ७/१२ उतारे वेगवेगळे झालेले आहेत. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यामध्ये खालील जादाचा मुद्दा निश्चित होणे आवश्यक आहे.

> Whether defendant prove previous partition was effected between plaintiffs and defendant predecessor in title of their properties ?

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे **निशाणी क्र.२०७** वर दाखल करून सदरचा अर्ज त्यांना मान्य नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार वादी ही आनंदा जयराम पाटील यांची कधीही वारस असल्याचे दाव्यात नमूद नाही. तसेच संतू यादव यांच्या हिश्शात वादीचा हिस्सा असल्याचे दाव्यात कोठेही नमूद नाही. यामुळे दाव्यात नवीन मुद्दा निश्चित करण्याची आवश्यकता नसल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांनी **निशाणी क्र.२०८** वर अर्ज सादर करून असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी विरुद्ध वाटपासाठी व स्वतंत्र कब्जासाठी दाखल करून दरम्यानचे उत्पन्न मिळण्याची विनंती केली आहे. तसेच, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **निशाणी क्र. ४०** वरील कैफियतीनुसार दाव्यात खालील जादाचे मुद्दे निश्चित होणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

1. Whether plaintiff prove that, they have share in suit property ?
2. Whether plaintiff proves that, they have belongs to defendants family ?
3. Whether plaintiff proves that, suit properties are ancestral properties of plaintiff ?
4. Whether plaintiff proves that, genealogy in plaint para no.1 is true and correct ?
5. Whether plaintiff prove that, course of action arise on 01/03/1996 for filing suit ?
6. Whether the suit is hit by miss joinder of necessary parties and properties ?
7. Whether the suit is hit by non joinder of necessary parties ?
8. Whether the suit is property valued ? And proper court fee stamp is affixed to this suit ?
9. Whether the plaintiff suit is within limitation ?

०४. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, वरीलप्रमाणे मुद्दे निश्चित केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर मुद्द्यामुळे प्रकरण गुणदोषांवर निर्गमित करण्यासाठी मदत होणार नाही. सबब प्रतिवादी यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादी यांनी **निशाणी क्र.२०९** वर प्रस्तुत अर्जासाठी त्यांचे म्हणणे सादर करून सदरचा प्रतिवादी यांचा अर्ज खोटा व चुकीचा असल्यामुळे तो त्यांना मान्य होण्यासारखा नाही. वादी यांच्या म्हणण्यानुसार, वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद लक्षात घेता प्रतिवादी यांनी सुचविलेले मुद्दे काढण्याची आवश्यकता नाही. सबब वादी यांनी प्रतिवादी यांचा **निशाणी क्र.२०८** वरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. प्रस्तुतचे अर्ज व त्यांच्यावर दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०७. प्रस्तुत दावा हा वाटपासाठी तसेच दरम्यानचे उत्पन्न ठरवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये **निशाणी क्र.६३** वर दिनांक १४/०७/२००५ रोजी मुद्दे निश्चित केल्याचे दिसून येते. तद्नंतर दाव्यामध्ये दुरूस्ती झाल्याचे, त्याचप्रमाणे कैफियतीमध्ये देखील दुरूस्ती झाल्याचे अभिलेखावरून अवलोकित होते. त्या

अनुषंगाने दोन्ही पक्षकारांची वाद कथने पाहाता, त्या अनुषंगाने मुद्दे निश्चित होणे व त्या आधारे दावा गुणांवर चालणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १४, नियम ०५ अन्वये दाव्याचा गुणांवर निपटारा होण्यासाठी, दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्याची तरतूद आहे. त्यामुळे, वादी व प्रतिवादी सुचवितात त्या प्रमाणे, अतिरिक्त मुद्दे निश्चित होण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने वादी यांचा **निशाणी क्र.२०६** मधील सुचवलेला मुद्दा म्हणजेच दोन्ही पक्षकारांच्या पूर्वहक्कदारांमध्ये दावा मिळकतीच्या अनुषंगाने वाटण्या झाल्या होत्या काय ? हा मुद्दा निश्चित होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ यांचा **निशाणी क्र.२०८** मधील अर्जात सुचविलेले मुद्द्यांपैकी,  वादी ही प्रतिवादींच्या घराण्याशी संबंधीत व्यक्ती आहे काय ? तसेच, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलार्जित मिळकत आहे काय ? तसेच, दाव्यास गैरपक्षकार केल्याची बाधा राहाते काय ? तसेच आवश्यक ते पक्षकार केल्याची बाधा राहाते काय ?  आणि दाव्याचे मूल्यांकन व्यवस्थित केले आहे काय? हे मुद्दे अंतर्भूत होणे, आवश्यक आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त मुद्दे निश्चित करणे आवश्यक वाटते. प्रतिवादी यांनी सुचविलेले दाव्यास कारण व वंशावळ हे दोन्ही मुद्दे आवश्यक राहात नाहीत. करिता, वादी यांचा **निशाणी क्र.२०६** वरील अर्ज मंजूर होण्यास व प्रतिवादी क्र.१ यांचा **निशाणी क्र. २०८** वरील अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र राहातो. दोन्ही पक्षकारांनी मुद्दे सुचविल्यामुळे खर्चाबाबत आदेश करणे उचित होणार नाही. सबब मी, **निशाणी क्र.६३** वर अतिरिक्त मुद्दे निश्चित करत आहे. करिता खालील आदेश पारित करत आहे. -

## <u>आदेश.</u>

१. अर्ज **निशाणी क्र. २०६** मंजूर करण्यात येतो व अर्ज **निशाणी क्र. २०८** अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. **निशाणी क्र.६३** वर अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्यात येतात.

३. दोन्ही पक्षकारांना अतिरिक्त मुद्द्याच्या अनुषंगाने पुराव्याची संधी उपलब्ध राहील.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

५. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.06.18 16:49:25 +0530

**(**श्रीनिवास अ**. कुलकर्णी)**

दिनांक. १८/०६/२०२६.

सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव.